**<u>प्रेस नोट</u>**                    **दिनांक १८/०६/२०२६**

**<u>मेघवाडी पोलीस ठाणे येथे सन २०२० मध्ये दाखल खुनाच्या गुन्हयातील आरोपीस आजन्म कारावासाची व द्रव्य दंडाची शिक्षा सुनावल्याबाबत.</u>**

फिर्यादी नामे श्री. विजय कुप्पू स्वामी द्रविड, वय-३२ वर्षे, धंदा:-नोकरी, रा.ठि.रूम नंबर- १७७, सी/१३, प्रेमनगर, मद्रासी गल्ली, मच्छी मार्केटच्या मागे, श्री. मुत्तूमारी अम्मन मंदिराजवळ, जोगेश्वरी (पुर्व), मुंबई हे राहत असलेल्या परिसरातील चाळीमध्ये शनमुगम राजेंद्रन उर्फ सॅम उर्फ सोनू, वय ३६ वर्षे हा सुध्दा राहत होता तो गुंड प्रवृत्तीचा असल्याने त्याची परिसरामध्ये दहशत होती त्यामुळे सर्वजन त्याला घाबरत होते. फिर्यादी यांचा भाऊ अजय द्रविड यास शनमुगम याने त्यास बिअर आणण्यासाठी सांगितले त्याने बिअर आणण्यास नकार दिला. या कारणावरून त्यांच्यामध्ये वादावादी झाली त्यावेळी शनमुगम याने बघुन घेण्याची धमकी दिली होती.

सदर भांडणाचा राग मनात धरून आरोपीत शनमुगम याने अजय यास पकडले. त्यास फिर्यादी यांनी त्याच्या तावडीतुन सोडविण्याचा प्रयत्न केला असता शनमुगन याने त्याच्या हातातील सुळयासारख्या दिसणारे अनकुचीदार हत्यार फिर्यादी यांच्या हातावर उजव्या हाताच्या दंडावर व कपाळावर दोन्ही भुवयाच्या मध्ये जोराने वार केला असता ते जबर जखमी झाले. ते पाहुन अजय फिर्यादी यांना सोडविण्यासाठी पुढे गेला असता आरोपीत शनमुगम याने त्याच्या हातातील सुळयासारख्या दिसणा-या अनकुचिदार हत्यार अजय याच्या छातीत खुपसल्याने तो जागीच कोसळला. त्यास रूग्णालयात दाखल केले असता वैदयकीय अधिकारी यांनी दाखल पुर्व मयत घोषित केले. त्यामुळे फिर्यादी यांनी आरोपीत शनमुगम राजेंद्रन उर्फ सॅम उर्फ सोनू, वय ३६ वर्षे याचे विरोधात दिलेल्या तक्रारीवरून मेघवाडी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १९०/२०२० कलम ३०२, ३०७ भादंवि अन्वये दि.२६/०५/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री.मधुसुदन नाईक यांनी करून यातील आरोपी विरूध्द मा.सत्र न्यायालय दिंडोशी कोर्ट नं. १० येथे दोषारोपपत्र दाखल केले होते. सदर खटल्याची सुनावणी आज दि. १८/०६/२०२६ रोजी पुर्ण झाली. मा.न्यायालयांनी सदर खटल्याचे सुनावणीचे वेळी तत्कालीन तपासी अधिकारी पो.नि. मधुसूदन नाईक व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी दिलेल्या साक्षीचे आधारे यातील आरोपीस दोषी मानुन भा.द.वि.कलम ३०२ अंतर्गत आजन्म कारावास व ५०००/-रूपये द्रव्य दंड आणि दंड न भरल्यास ३ महिने साधी कारावास, भा.द.वि.कलम ३२४ साठी ३ वर्षे कारावास व २०००/-रूपये द्रव्य दंड आणि दंड न भरल्यास २ महिने साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे. सदर खटल्याचे सुनावणीत सरकारी पक्षाकडून सरकारी अभियोक्ता श्री.सुधीर सपकाळे साहेब व योगेश आंबेकर यांनी कामकाज पाहिले.

**मेघवाडी पोलीस ठाणेचे अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयातील अटक आरोपीताविरोधात भक्कम पुरावे मा. न्यायालयात सादर केल्याने मा. न्यायालयाने अटक आरोपीतास आजन्म कारवासाची शिक्षा सुनावल्याची उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.**

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (का व सु) श्री. डॉ. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री. डॉ. अभिनव देशमुख, मा. पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ ०३,मुंबई श्री. दत्ता नलावडे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, अंधेरी विभाग (अतिरीक्त कार्यभार मेघवाडी विभाग) श्री. गजानन पवार यांचे मार्गदर्शनानुसार व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मेघवाडी पोलीस ठाणे श्री. सुधाकर हुंबे यांचे सुचनांप्रमाणे पोलीस निरीक्षक श्याम पवरे, कोर्ट कारकुन पो.हवा./९६१८९९/ श्री.सुनिल नांदे, म.पो.शि./ ११२४२८/श्रीमती सुरेखा मोरे, गुन्हे लेखनिक सहा.पो.फौ./३२९०७ श्री.विजय शिंदे, पो.शि./०९७७०/श्री. अमोल पवार, समन्स व वारंट अंमलदार पो.हवा./०९०२०६/श्री.गणेश बर्वे, पो.शि./०८७६५ श्री.विवेक कांबळी यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.